फौजदारी किरकोळ अर्ज. **<u>२७५/२०२४</u>**
राणी विरूद्ध अतुल व इतर
**निशाणी १० खाली**

**<u>अर्जदार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ राणी अतुल घोटकर हिची उलटतपासणी शपथेवर सुरू — गैरअर्जदारांतर्फे ॲड. श्रीमती. आर. आर. सांगोळे यांचे मार्फत</u>**

हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत केस व्यतिरीक्त खावटी मिळण्यासाठी आणखी एक केस दाखल केली आहे. सामनेवाला क्र. १ प्रस्तुत प्रकरण प्रलंबित असतांना दि. ०१/१२/२०२४ रोजी मयत झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे सामनेवाला क्र. १ सोबत झालेल्या लग्नाआधी गैरअर्जदार क्र. ३ हिचे लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदार क्र. ३ तिच्या सासरी राहते. हे म्हणणे खरे नाही की, मी सासरी नांदायला गेली त्यावेळी माझे पती हे गैरअर्जदार क्र. २ आईपासुन विभक्त राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पतीसोबत सतत वाद करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी वाद करत असल्यामुळे माझे पतीला दारूचे व्यसन जडले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पतीला न सांगता वारंवार माहेरी येउन राहत असे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मयत झाल्यानंतर मी मला लग्नात मिळालेल्या सर्व भेटवस्तु माहेरी परत घेउन आली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी येतांना माझे सोन्याचे दागिने माहेरी सोबत आणले आहेत. माझे पती मी माहेरी आल्यामुळे आजारी पडले किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती आजारी असतांना मी त्याला भेटण्यासाठी गेले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तो आजारी असल्याबाबत मला कोणीच सांगितले नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीजवळ दुचाकी वाहन होते. हे म्हणणे खरे आहे की, ते वाहन माझे पतीने शोरूम मधुन हफत्याने विकत घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुचाकीच्या ताब्याबाबत मी शोरूममध्ये जाउन हरकत घेतली होती. माझे पतीचे जनता बॅक, अंजनगांव येथे बॅक खाते होते किंवा कसे हे मला माहित नाही. माझे पतीने घरावर कर्ज काढुन ठेवले होते किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दर्यापुर न्यायालयात हिस्से वाटणीचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती माझे म्हणणयानुसार गैरअर्जदार क्र. ३ सोबत सतत वाद करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे

गैरअर्जदार क्र. ३ ही माझे सासरी येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीला दारू पिण्याचे व्यसन जडले याबाबत मी गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्याकडे तक्रार केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी 'तु गरिबाघरची मुलगी आहे, तुला घरात मोलकरणीसारखे राबवु' असे मला म्हटल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी माझे पतीला माझेविरूध्द कधीही भडकावले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा गैरअर्जदार यांनी जबरदस्तीने गर्भपात घडवुन आणला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मुलीला जन्म दिल्याची बाब गैरअर्जदार यांना कळवली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. २ व ३ यांना माझे मुलीस भेटु देत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०२/२०२४ रोज मला मारहाण करून माझा गळा दाबला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पती यांनी गैरअर्जदार क्र. ३ हिला आमचे घरी येण्यास मज्जाव केलेला होता. माझे पतीने एक एकर शेत विकले होते किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेत विक्रीतुन आलेली रक्कम रू. १५,००,०००/— मी माहेरी घेउन आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर रक्कम माहेरी घेउन आली याचा माझे पतीला मानसिक धक्का बसला होता व त्यामुळे त्याचे दारूचे व्यसन वाढले होते व त्यामुळे तो आजारी पडुन मयत झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझे पतीचा मृत्यु मी मानसिक त्रास दिल्यामुळे झाला.

३. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीचा आजारपणाचा सर्व खर्च गैरअर्जदार क्र. २ ने केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. २ व ३ विरूध्द खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०८.१०.२०२५<br>
अकोट

(ए.ए. माळी)<br>
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>
(न्यायालय क्र. २)<br>
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.